सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक २३

# मुंबईचा न्यायदान विषयक व कार्यपालन विषयक कामे विभक्त करण्याबाबत अधिनियम, १९५१

(दिनांक १३ नोव्हेंबर, २००६ पर्यंत सुधारित)

# The Bombay Separation of Judicial and Executive Functions Act, 1951

## (As modified upto 13th November, 2006)

व्यवस्थापक, येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे-४११ ००६ यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि
संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य,
मुंबई-४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित

२००६

[ किंमत : १३.६० रुपये ]

S(H) 1203

# मुंबईचा न्यायदान विषयक व कार्यपालन विषयक कामे विभक्त करण्याबाबत अधिनियम, १९५१

## अनुक्रमणिका


| उद्देशिका | | पृष्ठे |
|---|---|---|
| कलमे | | |
| १. | लघु संज्ञा, व्याप्ती व सुरुवात .. | ०१ |
| २. | अधिनियमांची सुधारणा .. | ०१ |
| ३. | अधिनियम अंमलात येण्यापूर्वी काढलेल्या अधिसूचना, आदेश वगैरे सुधारणांमुळे अवैध न ठरणे. | ०२ |
| ४. | बचाव .. | ०२ |
| | अनुसूची .. | ०३ |


H-1203-1

# सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक २३ [१*]

## मुंबईचा न्यायदान विषयक व कार्यपालन विषयक कामे विभक्त करण्याबाबत अधिनियम, १९५१

[५ जुलै १९५१]

ह्या अधिनियमात पुढील अधिनियमान्वये सुधारणा करण्यात आल्या आहेत:—

सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३९.

सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३४.

सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक २१.

मुंबई विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९५६ द्वारे अनुकूलन व फेरबदल करण्यात आले.

**मुंबई राज्यात न्यायदान विषयक व कार्यपालन विषयक कामे विभक्त करण्याची तरतूद करण्याबाबत अधिनियम**

ज्याअर्थी, मुंबई राज्यातील अधिकाऱ्यांनी करावयाची न्यायदान विषयक व कार्यपालन विषयक कामे विभक्तपणे करण्यासाठी तरतूद करणे इष्ट करणे;

त्याअर्थी, याअन्वये पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात आला आहे :—

लघु संज्ञा, व्याप्ती व सुरुवात.

**१.** (१) ह्या अधिनियमास मुंबईचा न्यायदान विषयक व कार्यपालन विषयक कामे विभक्त करण्याबाबत अधिनियम, १९५१ असे म्हणावे

(२) तो [२][पुनर्रचनेपूर्वीच्या मुंबई राज्यास (हस्तांतरित केलेली राज्यक्षेत्रे वगळून)] लागू आहे.

(३) तो राज्य शासन याबाबत राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे जी तारीख निर्दिष्ट करील त्या तारखेस अंमलात येईल.

अधिनियमांची सुधारणा.

**२.** ह्या अधिनियमात जोडलेल्या अनुसूचीचे (जिचा उल्लेख यात यापुढे अनुसूची असा केला आहे). भाग १ व २ यात निर्दिष्ट केलेले केंद्रीय अधिनियम [३][पुनर्रचनेपूर्वीच्या मुंबई राज्यास] लागू असतील तेथवर आणि अनुसूचीचा भाग ३ यात निर्दिष्ट केलेले मुंबई अधिनियम हे अनुसूचीच्या चौथ्या आसनात निर्दिष्ट केलेल्या मर्यादेपर्यंत याअन्वये सुधारण्यात आले आहेत.

---

[१] उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी, मुंबई शासन राजपत्र, १९५१, भाग-पाच, पृष्ठ २८-२९ पहा; निवड समितीच्या अहवालासाठी वरील राजपत्र पहा.

[२] मुंबई विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९५६ द्वारे "सबंध मुंबई राज्यात" या मजकुराऐवजी दाखल केला;

[३] वरील आदेशाद्वारे "मुंबई राज्यास" या मजकुराऐवजी दाखल केला.

अधिनियम अंमलात येण्यापूर्वी काढलेल्या अधिसूचना, आदेश वगैरे सुधारणांमुळे अवैध न ठरणे. ३. ज्या रीतीने, ज्या अधिकाऱ्याने आणि ज्या विधिअन्वये किंवा विधिनुसार कोणतेही अधिकार चालविण्याजोगे असतील ती रीत, तो प्राधिकारी किंवा तो विधी यात फेरफार करण्याच्या दृष्टीने ह्या अधिनियमाच्या ज्या उपबंधावरून अनुसूचीत निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही अधिनियमाची, सुधारणा करण्यात आली असेल त्या उपबंधामुळे, हा अधिनियम अंमलांत येण्यापूर्वी योग्य रीतीने काढलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला कोणताही आदेश वरिष्ठ न्यायालयाकडे इन्साफाकरिता पाठविलेले, कोणतेही प्रकरण किंवा केलेली कोणतीही जप्ती, उपविधी, नियम किंवा विनियम किंवा योग्य रीतीने केलेले कोणतेही कृत्य हे अवैध ठरणार नाही; आणि अशी कोणतीही अधिसूचना, आदेश, वरिष्ठ न्यायालयाकडे इन्साफासाठी पाठविलेले प्रकरण, जप्ती, उपविधी, नियम किंवा विनियम किंवा कृत्य हे, जणू ते हा अधिनियम अंमलात आल्यानंतर सक्षम प्राधिकाऱ्याने आणि अशा बाबतीत त्यावेळी लागू असलेल्या उपबंधानुसार करण्यात आले होते असे समजून तशाच रीतीने, तशाच मर्यादेपर्यंत आणि तशाच परिस्थितीत, रद्द करता येईल, त्यात फेरफार करता येईल किंवा ते फिरवता येईल;

बचाव. ४.[१] [(१) [२][ह्या कलमात जी तरतूद केली असेल ती खेरीज करून, ह्या अधिनियमातील कोणत्याही उपबंधामुळे] पुढील गोष्टींस बाध येतो असे समजता कामा नये :—

(अ) एखाद्या क्षेत्रात ह्या अधिनियमाचे उपबंध ज्या तारखेस अंमलात येतील त्या तारखेपूर्वी अशा क्षेत्रात केलेल्या किंवा करू दिलेल्या कोणत्याही कृत्याची वैधता, अवैधता किंवा परिणाम ;

(ब) अशा तारखेपूर्वी अगोदरच संपादन केलेला, प्राप्त झालेला किंवा पत्करलेला कोणताही हक्क, विशेष अधिकार किंवा कोणतेही बंधन किंवा पात्रता ;

(क) अशा तारखेपूर्वी केलेल्या कोणत्याही कृत्यामुळे प्राप्त झालेली किंवा केलेली कोणतीही शास्ती, किंवा शिक्षा किंवा आणलेली कोणतीही जप्ती ;

(ड) तसा हक्क, विशेष अधिकार, बंधन, पात्रता, शास्ती, जप्ती किंवा शिक्षा यासंबंधीची कोणतीही चौकशी किंवा वैधरीत्या चालू केलेले कोणतेही काम किंवा कोणतीही उपाययोजना;

[३][आणि अशा अधिनियमान्वये सुधारणा केलेल्या संबद्ध अधिनियमाच्या उपबंधास अनुसरून कोणतीही चौकशी, वैध कारवाई किंवा उपाययोजना सुरू करता येईल, चालू ठेवता येईल किंवा अंमलात आणता येईल तसेच अशी कोणतीही शास्ती किंवा शिक्षा करता येईल आणि अशी जप्ती अणता येईल].

---

[१] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३४ याच्या कलम १२ द्वारे कलम ४ ला त्याचे पोट-कलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात आला.

[२] वरील अधिनियमाद्वारे "या अधिनियमातील कोणत्याही गोष्टींमुळे" या मजकुराऐवजी दाखल केला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम १२ द्वारे खंड (ई) ऐवजी हा मजकूर दाखल केला.

[1][(२) हा अधिनियम अंमलात येईल त्या तारखेस फौजदारी न्यायाधीशापुढे किंवा न्यायालयापुढे अनिर्णित असलेली अशी वैधरीत्या चालू केलेली सर्व कामे ही, ह्या अधिनियमान्वये सुधारणा केलेल्या संबद्ध अधिनियमाच्या उपबंधान्वये अशा फौजदारी न्यायाधीशास किंवा न्यायालयास अशा कामाच्या बाबतीत, क्षेत्राधिकार असण्याचे बंद झाले असेल तर, ह्या अधिनियमान्वये सुधारणा केलेल्या संबद्ध अधिनियमाच्या उपबंधान्वये क्षेत्राधिकार असलेल्या फौजदारी न्यायाधीशाकडे किंवा न्यायालयाकडे पाठविण्यात आली आहेत असे समजले पाहिजे आणि त्यांची सुनावणी व निर्णय अशा फौजदारी न्यायाधीशाने किंवा न्यायालयाने केली पाहिजे आणि अशा फौजदारी न्यायाधीशास व न्यायालयास, जणू अशी कामे अशा फौजदारी न्यायाधीशापुढे किंवा अशा न्यायालयात प्रारंभतः दाखल करण्यात आली होती असे समजून त्यासंबंधी सर्व अधिकार व क्षेत्राधिकार असेल].

## अनुसूची

(कलम २ पहा)

भाग १—दंड प्रक्रिया संहिता, १८९८

| वर्ष | क्रमांक | लघु संज्ञा | | सुधारणा कोठवर केली ते |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | | ४ |
| १८९८ | ५ | दंड प्रक्रिया संहिता, १८९८. | फौजदारी न्यायालयाचे वर्ग. | १. कलम ६ ऐवजी पुढील कलम दाखल करावे—<br>"६. उच्च न्यायालय व ह्या संहिते व्यतिरिक्त त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही विधि अन्वये स्थापना करण्यात आलेले न्यायालय याशिवाय मुंबई राज्यात आणखी दोन वर्गाची फौजदारी न्यायालये असतील—<br>(१) सेशन न्यायालये.<br>(२) फौजदारी न्यायाधीशांची न्यायालये"<br>२. कलम ६ नंतर पुढील कलम दाखल करावे— |
| | | | फौजदारी न्यायाधीशांचे वर्ग. | "६-अ पुढील वर्गाचे फौजदारी न्यायाधीश असतील—<br>१. न्यायिक फौजदारी न्यायाधीश—<br>(१) प्रेसिडेन्सी फौजदारी न्यायाधीश,<br>(२) पहिल्या वर्गाचे फौजदारी न्यायाधीश,<br>(३) दुसऱ्या वर्गाचे फौजदारी न्यायाधीश,<br>(४) तिसऱ्या वर्गाचे फौजदारी न्यायाधीश,<br>(५) विषेश न्यायिक फौजदारी न्यायाधीश. |

१ सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३४, पोट-कलम (२) समाविष्ट केले.

| वर्ष | क्रमांक | लघु संज्ञा | सुधारणा कोठवर केली ते |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |

२. अधिशासी फौजदारी न्यायाधीश—

(१) जिल्हा फौजदारी न्यायाधीश,

(२) उपविभाग फौजदारी न्यायाधीश,

(३) तालुका फौजदारी न्यायाधीश,

(४) राज्य सरकारने खास अधिकार दिलेले प्रेसिडेन्सी फौजदारी न्यायाधीश,

(५) विषेश अधिशासी फौजदारी न्यायाधीश."

३. कलम ७ ऐवजी पुढील कलम दाखल करावे—

सेशन विभाग व चिन्हे.

"७. (१) मुंबई राज्यात सेशन विभाग असतील आणि प्रत्येक सेशन विभाग हा, संहितेच्या प्रयोजनाकरिता, जिल्हा म्हणून असेल किंवा तो अनेक जिल्ह्यांचा मिळून होईल.

(२) ह्या संहितेच्या प्रयोजनांकरिता बृहन्मुंबई सेशन विभाग म्हणून असेल आणि ती एक जिल्हा म्हणून आहे असे समजले पाहिजे.

(३) राज्य सरकारास, असे विभाग आणि जिल्हे यांच्या हद्दीत किंवा संज्ञेत फेरफार करण्याचा अधिकार आहे.

१९५१ चा मुंबई, २३.

(४) मुंबईचा न्यायदानविषयक व कार्यपालन-विषयक कामे विभक्त करण्याबाबत अधिनियम, १९५१, अंमलात येईल त्यावेळी अस्तित्वात असलेले सेशन विभाग व जिल्हे हे, त्यात अशा रीतीने फेरफार करण्यात आला नसेल तर व फेरफार करण्यात येईपर्यंत, अनुक्रमे असे सेशन विभाग व जिल्हे म्हणून असतील."

४. कलम ८, पोट-कलम (१) मध्ये, "इलाखा शहरांबाहेरील" ह्या शब्दांच्या ऐवजी "बृहन्मुंबई बाहेरील" हे शब्द दाखल करावे.

| वर्ष | क्रमांक | लघु संज्ञा | सुधारणा कोठवर केली ते |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | | | ५. कलम ९ मध्ये— <br> (१) पोट-कलम (१) मध्ये, "स्थापिले पाहिजे व" या शब्दांच्याऐवजी "उच्च न्यायालयाशी सल्लामसलत करून" हे शब्द दाखल करावे. <br> (२) पोट-कलम (३) मध्ये, "क्षेत्राधिकार चालविण्यासाठी" या शब्दानंतर "उच्च न्यायालयाशी सल्लामसलत करून" हे शब्द दाखल करावे. <br> (३) पोट-कलम (४) मध्ये, "एका सेशन विभागाच्या सेशन न्यायाधीशास" या शब्दानंतर "उच्च न्यायालयाशी सल्लामसलत करून" हे शब्द दाखल करावे. <br> ६. कलम १० मध्ये— <br> (१) पोट-कलम (१) मध्ये— <br> (अ) "इलाखा शहराबाहेरील" या शब्दांऐवजी "बृहन्मुंबई बाहेरील" हे शब्द दाखल करावे— <br> (ब) "पहिल्या वर्गाचा फौजदारी न्यायाधीश नेमला पाहिजे व त्यास जिल्हा फौजदारी न्यायाधीश असे संबोधण्यात आले पाहिजे" हे शब्द गाळण्यात यावेत. <br> (२) पोट-कलम (२) मध्ये, "पहिल्या वर्गाच्या कोणत्याही फौजदारी न्यायाधीशास" हे शब्द गाळण्यात यावेत. <br> (३) पोट-कलम (३) गाळण्यात यावे. <br> ७. कलम १२ मध्ये— <br> (१) पोट-कलम (१) मध्ये— <br> (अ) "जिल्हा फौजदारी न्यायाधीशाखेरीज" हे शब्द गाळण्यात यावेत. <br> (ब) "इलाखा शहराबाहेरील" या शब्दांऐवजी "बृहन्मुंबई बाहेरील" हे शब्द दाखल करण्यात यावे. |

| वर्ष | क्रमांक | लघु संज्ञा | सुधारणा कोठवर केली ते |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |

(क) "राज्य सरकारास किंवा राज्य सरकारच्या नियंत्रणास अधीन राहून जिल्हा फौजदारी न्यायाधीशास" हे शब्द गाळण्यात यावे.

(२) पोट-कलम (१) नंतर, पुढील पोट-कलम दाखल करावे—

"(१-अ) पोट-कलम (१) अन्वये फौजदारी न्यायाधीश नेमण्याचा अधिकार हा, संविधानाचा अनुच्छेद २३७ या अन्वये सरकारी अधिसूचना काढण्यात आल्यानंतर. उक्त अधिसूचनेच्या शर्तीस अधीन राहून, चालविला पाहिजे."

(३) उक्त कलमाच्या समास टीपेऐवजी पुढील समास टीप दाखल करावी—

"न्यायिक फौजदारी न्यायाधीश".

८. कलम १३ मध्ये—

(१) पोट-कलम (१) मध्ये, "पहिल्या किंवा दुसऱ्या वर्गाच्या" हे शब्द गाळण्यात यावेत आणि "उपविभाग" ह्या शब्दानंतर "किंवा तालुका" हे शब्द दाखल करावे,

(२) पोट-कलम (२) मध्ये, "उपविभाग फौजदारी न्यायाधीश" या शब्दांच्या ऐवजी "यथास्थिति उपविभाग फौजदारी न्यायाधीश किंवा तालुका फौजदारी न्यायाधीश" हे शब्द दाखल करावेत,

(३) उक्त कलमाच्या समास टिपेमध्ये "किंवा तालुका" हे शब्द दाखल करावे.

९. कलम १४ ऐवजी पुढील मजकूर दाखल करावा—

विशेष फौजदारी न्यायाधीश.

"१४. (१) राज्य सरकारास, उच्च न्यायालयाशी सल्लामसलत करून कोणत्याही स्थानिक क्षेत्रात विवक्षित प्रकरणासंबंधी किंवा विवक्षित एका किंवा अनेक वर्गातील प्रकरणासंबंधी किंवा सर्वसाधारण प्रकरणासंबंधी न्यायिक फौजदारी न्यायाधीशास ह्या संहितेअन्वये किंवा तद्नुसार

| वर्ष | क्रमांक | लघु संज्ञा | सुधारणा कोठवर केली ते |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | | | जे अधिकार दिलेले असतील किंवा जे देता येण्याजोगे असतील ते सर्व अधिकार किंवा त्यापैकी कोणतेही अधिकार कोणत्याही इसमास देण्याचा अधिकार आहे. असे फौजदारी न्यायाधीशांना विशेष न्यायिक फौजदारी न्यायाधीश म्हणून संबोधण्यात येईल आणि त्यांची नेमणूक, राज्य सरकार उच्च न्यायालयाशी सल्लामसलत करून सामान्य किंवा विशेष आदेशाद्वारे जी मुदत निर्दिष्ट करील त्या मुदतीसाठी करण्यात येईल. |
| | | | (२) तसेच राज्य सरकारास, विवक्षित क्षेत्रांसाठी किंवा विवक्षित कामे पार पाडण्यासाठी अधिशासी फौजदारी न्यायाधीशांची नेमणूक करण्याचा आणि आपणास योग्य वाटतील असे अधिकार अशा फौजदारी न्यायाधीशास देण्याचा अधिकार आहे. अशा फौजदारी न्यायाधीशांना विशेष अधिशासी फौजदारी न्यायाधीश असे संबोधण्यात आले पाहिजे, आणि त्यांची नेमणूक राज्य सरकार, सामान्य किंवा विशेष आदेशाद्वारे जी मुदत निर्दिष्ट करील त्या मुदतीसाठी करण्यात येईल; |
| | | | परंतु, साहायक अधीक्षकाच्या श्रेणीपेक्षा कमी श्रेणीच्या कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यास ह्या कलमान्वये कोणतेही अधिकार देता कामा नये आणि कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यास शांतता राखणे, गुन्ह्यास प्रतिबंध करणे व अपराध्यास फौजदारी न्यायाधीशासमोर उभे करण्याकरिता त्यांना शोधून काढणे, पकडणे व अटकावून ठेवणे यासाठी आणि अशा पोलीस अधिकाऱ्याने त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधि अन्वये त्याजकडे सोपविण्यात आलेली कोणतीही इतर कामे पार पाडण्यासाठी आवश्यक असतील त्या व्यतिरिक्त इतर कोणतेही अधिकार देता कामा नये. |

| वर्ष | क्रमांक | लघु संज्ञा | सुधारणा कोठवर केली ते |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | | | (३) राज्य सरकास, त्यास योग्य वाटतील अशा मर्यादा घालून, पोट-कलम (२) अन्वये मिळालेले अधिकार आपल्या नियंत्रणाखालील कोणत्याही अधिकाऱ्यास देण्याचा अधिकार आहे." |
| | | | १०. कलम १५, पोट-कलम (१) यात "राज्य सरकारास इलाखा शहराबाहेरील कोणत्याही ठिकाणी दोन किंवा अधिक फौजदारी न्यायाधीशांनी न्यायाधीश मंडळ मंडळ म्हणून एकत्र बसून काम करावे असा निदेश त्यांना देण्याचा अधिकार आहे" ह्या शब्दांच्याऐवजी "राज्य सरकाराने, उच्च न्यायालयाशी सल्लामसलत करून, बृहन्मुंबई बाहेरील कोणत्याही ठिकाणी कोणत्याही दोन किंवा अधिक न्यायिक फौजदारी न्यायाधीशांनी न्यायाधीश मंडळ म्हणून एकत्र बसून काम करावे असा निदेश त्यांना देण्याचा अधिकार आहे" हे शब्द दाखल करावे. |
| | | | ११. कलम १६ मध्ये, "राज्य सरकारास किंवा राज्य सरकारच्या नियंत्रणास अधीन राहून, जिल्हा फौजदारी न्यायाधीशास" ह्या शब्दांच्याऐवजी "राज्य सरकारच्या मंजुरीस अधीन राहून उच्च न्यायालयास" हे शब्द दाखल करावे. |
| | | | १२. कलम १७ मध्ये—<br>(१) पोट-कलम (१) मध्ये—<br>(अ) "सर्व फौजदारी न्यायाधीश" ह्या शब्दांच्याऐवजी "सर्व न्यायिक फौजदारी न्यायाधीश" हे शब्द दाखल करावे.<br>(ब) "१३" हा आकडा गाळण्यात यावा.<br>(क) "जिल्हा फौजदारी न्यायाधीशास" ह्या शब्दांच्याऐवजी "सेशन न्यायाधीशास" हे शब्द दाखल करावे.<br>(ड) शेवटी असलेला "आणि" हा शब्द गाळण्यात यावा. |

| वर्ष | क्रमांक | लघु संज्ञा | सुधारणा कोठवर केली ते |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | | | (२) पोट-कलम (२) आणि पोट-कलम (५) ही गाळण्यात यावी. |
| | | | (३) उक्त कलमाच्या समास टिपेत, "जिल्हा फौजदारी न्यायाधीश" या शब्दांच्याऐवजी "न्यायिक फौजदारी न्यायाधीश" आणि "जिल्हा फौजदारी न्यायाधीशांना" या शब्दांऐवजी "सेशन न्यायाधीशांना" हे शब्द दाखल करावे. |
| | | | १३. कलम १७ नंतर, पुढील कलमे दाखल करावी— |
| | | अधिशासी फौजदारी न्यायाधीश जिल्हा फौजदारी न्यायाधीशास अधीन असणे. | "१७-अ. कलमे १३ आणि १४ याअन्वये नेमलेले सर्व अधिशासी फौजदारी न्यायाधीश हे जिल्हा फौजदारी न्यायाधीशास अधीन असतील. |
| | | कनिष्ठ फौजदारी न्यायालये. | १७-ब. सेशन न्यायालये व (प्रेसिडेन्सी फौजदारी न्यायाधीशाची न्यायालये धरून) फौजदारी न्यायाधीशांची न्यायालये ही उच्च न्यायालयापेक्षा कनिष्ठ फौजदारी न्यायालये असतील आणि बृहन्मुंबई, बाहेरील फौजदारी न्यायाधीशांची न्यायालये ही सेशन न्यायालयापेक्षा कनिष्ठ फौजदारी न्यायालये असतील." |
| | | | १४. कलम १८, पोट-कलम (४) नंतर पुढील पोट-कलम दाखल करावे— |
| | | | "(५) मुख्य प्रेसिडेन्सी फौजदारी न्यायाधीश आणि अपर मुख्य प्रेसिडेन्सी फौजदारी न्यायाधीश यांची नेमणूक करण्याचा अधिकार हा उच्च न्यायालयाशी सल्लामसलत करून चालविण्यात आला पाहिजे आणि इतर प्रेसिडेन्सी फौजदारी न्यायाधीशांची नेमणूक करण्याचा अधिकार हा, |

| वर्ष | क्रमांक | लघु संज्ञा | सुधारणा कोठवर केली ते |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | | | संविधानाचा अनुच्छेद २३७ याअन्वये सार्वजनिक अधिसूचना काढण्यात आल्यानंतर उक्त अधिसूचनेच्या अटींस अधीन राहून चालविण्यात आला पाहिजे." |
| | | | १५. कलम २९-ब मध्ये— |
| | | | (१) "जिल्हा फौजदारी न्यायाधीश किंवा" हे शब्द गाळण्यात यावे. |
| | | | (२) "राज्य सरकारने खास अधिकार दिलेला कोणताही फौजदारी न्यायाधीश" ह्या शब्दांच्याऐवजी "राज्य सरकारने, उच्च न्यायालयाशी सल्लामसलत करून खास अधिकार दिलेला कोणताही न्यायिक फौजदारी न्यायाधीश" हे शब्द दाखल करावेत. |
| | | | १६. कलम ३६ मध्ये "जिल्हा फौजदारी न्यायाधीश, उपविभाग फौजदारी न्यायाधीश आणि पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या वर्गाचे फौजदारी न्यायाधीश यांस" ह्या शब्दांच्याऐवजी "विशेष न्यायिक व अधिशासी फौजदारी न्यायाधीशांव्यतिरिक्त इतर न्यायिक व अधिशासी फौजदारी न्यायाधीशांस" हे शब्द दाखल करावे. |
| | | | १७. कलम ३७ ऐवजी पुढील कलम दाखल करावे— |
| | | फौजदारी न्यायाधीशास देण्याजोगे जादा अधिकार. | "३७. कोणत्याही फौजदारी न्यायाधीशास त्याच्या साधारण अधिकाराखेरीज आणखी चौथ्या अनुसूचीत निर्दिष्ट केलेले अधिकार देण्याचा राज्य सरकारास अधिकार आहे: |
| | | | परंतु, न्यायिक फौजदारी न्यायाधीशांच्या बाबतीत उच्च न्यायालयाशी सल्लामसलत करून, असे अधिकार देण्यात आले पाहिजेत; |

| वर्ष | क्रमांक | लघु संज्ञा | सुधारणा कोठवर केली ते |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | | | तसेच, राज्य सरकारास, जिल्हा फौजदारी न्यायाधीशास, त्यास अधीन असलेल्या कोणत्याही फौजदारी न्यायाधीशास चौथ्या अनुसूचीचा भाग २ यात निर्दिष्ट केलेल्या अधिकारांपैकी कोणतेही अधिकार देण्यास अधिकृत करण्याचा अधिकार आहे." |
| | | | १८. कलम ३८ मध्ये, "यास दिलेला" ह्या शब्दांच्याऐवजी "याजकडे सोपविलेला" हे शब्द दाखल करावे. |
| | | | १९. कलम ३८ नंतर पुढील कलम दाखल करावे:— |
| | | उच्चं न्यायालयाशी सल्लामसलत करून न्यायिक फौजदारी न्यायाधीशांना अधिकार देणे. | "३८-अ संविधानाच्या सप्तम अनुसूचीच्या सूची २ व ३ यांत निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही बाबींसंबंधी ह्या संहितेचे किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधीचे जे कोणतेही उपबंध असतील त्या अन्वये कोणतेही न्यायदानविषयक अधिकार, सेशन न्यायाधीश, अप्पर किंवा सहायक सेशन न्यायाधीश किंवा न्यायिक फौजदारी न्यायाधीश यास द्यावयाचे असतील किंवा असे अधिकार चालविण्यासाठी खास रीतीने अधिकार अशा कोणत्याही फौजदारी न्यायाधीशास द्यावयाचा असेल तेव्हा राज्य सरकारने त्या आदेशाद्वारे असे अधिकार देण्यात येतील किंवा असे अधिकार चालविण्यासाठी अधिकार देण्यात येईल ते आदेश उच्च न्यायालयाशी सल्लामसलत करून दिले पाहिजेत. मग अशा उपबंधात अशी सल्लामसलत करण्याविषयी स्पष्ट तरतूद केली नसली तरी ती गोष्ट विचारात घेता कामा नये. |

| वर्ष | क्रमांक | लघु संज्ञा | सुधारणा कोठवर केली ते |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | | | **स्पष्टीकरण.**—ह्या कलमाच्या प्रयोजनांकरिता कोणतेही अधिकार हे न्यायदानविषयक आहेत किंवा कसे ह्या प्रश्नाचा निर्णय, राज्य सरकारने, उच्च न्यायालयाशी सल्लामसलत करून केला पाहिजे व असा निर्णय अखेरचा असेल." |
| | | | २०. कलम ४१, पोट-कलम (१) यात पुढील परंतुक दाखल करावे:— |
| | | | "परंतु, न्यायिक फौजदारी न्यायाधीशांच्या बाबतीत असे अधिकार काढून घेण्याचे काम उच्च न्यायालयाशी सल्लामसलत करून करण्यात आले पाहिजे." |
| | | | २१. कलम ७७, पोट-कलम (२) यात "फौजदारी न्यायाधीशांपुढे हजर होण्याविषयी फर्माविण्यात आल्यास" ह्या शब्दांच्याऐवजी "क्षेत्राधिकार असणाऱ्या फौजदारी न्यायाधीशांपुढे हजर होण्याविषयी फर्माविण्यात आल्यास" हे शब्द दाखल करावे. |
| | | | २२. कलम ६३ यात "फौजदारी न्यायाधीशांच्या विशेष आदेशावाचून ह्या शब्दांचेऐवजी "अधिकार क्षेत्र असणाऱ्या फौजदारी न्यायाधीशांच्या विशेष आदेशावाचून" हे शब्द दाखल करावे. |
| | | | २३. कलम ८७, पोट-कलम (१) यात, "किंवा उपविभाग फौजदारी न्यायाधीशास ह्या शब्दानंतर "किंवा पहिल्या वर्गाच्या फौजदारी न्यायाधीशास" हे शब्द दाखल करावे. |
| | | | २४. कलम ८८, पोट-कलम (६-क) यात "यथास्थिति" हा शब्द गाळण्यात यावा आणि "पहिल्या वर्गाच्या किंवा दुसऱ्या वर्गाच्या कोणत्याही फौजदारी न्यायाधीशाकडे त्यास अधीन असलेल्या कोणत्याही प्रेसिडेन्सी फौजदारी न्यायाधीशाकडे" ह्या शब्दांच्याऐवजी "कोणत्याही फौजदारी न्यायाधीशाकडे" हे शब्द दाखल करावे. |

| वर्ष | क्रमांक | लघु संज्ञा | सुधारणा कोठवर केली ते |
| --- | --- | --- | --- |
| १ | २ | ३ | ४ |
| | | | २५. कलम ९४, पोट-कलम (१) यात "कलकत्ता आणि मुंबई शहरांच्या हद्दीपलीकडील" ह्या शब्दांच्याऐवजी "बृहन्मुंबईच्या हद्दीपलीकडील" हे शब्द दाखल करावेत. |
| | | | २६. कलम १०६, पोट-कलम (१) यात "जिल्हा फौजदारी न्यायाधीश, उपविभाग फौजदारी न्यायाधीश" हे शब्द गाळण्यात यावे. |
| | | | २७. कलम १०७, पोट-कलम (१) यात "प्रेसिडेन्सी फौजदारी न्यायाधीश, जिल्हा फौजदारी न्यायाधीश, उपविभाग फौजदारी न्यायाधीश किंवा पहिल्या वर्गाचा फौजदारी न्यायाधीश यास" या शब्दांच्याऐवजी पुढील मजकूर दाखल करावा:— |
| | | | "याबाबत राज्य सरकारने खास अधिकार दिलेला प्रेसिडेन्सी फौजदारी न्यायाधीश किंवा उपविभाग फौजदारी न्यायाधीश किंवा याबाबत खास अधिकार दिलेला तालुका फौजदारी न्यायाधीश यास". |
| | | | २८. कलम १०८ मध्ये, "किंवा प्रेसिडेन्सी फौजदारी न्यायाधीश किंवा पहिल्या वर्गाचा फौजदारी न्यायाधीश" या शब्दांच्याऐवजी "किंवा उपविभाग फौजदारी न्यायाधीश किंवा प्रेसिडेन्सी फौजदारी न्यायाधीश" हे शब्द दाखल करावे. |
| | | | २९. कलम १०९ मध्ये, "प्रेसिडेन्सी फौजदारी न्यायाधीश, जिल्हा फौजदारी न्यायाधीश, उपविभाग फौजदारी न्यायाधीश किंवा पहिल्या वर्गाचा फौजदारी न्यायाधीश" या शब्दांच्याऐवजी "याबाबत राज्य सरकारने खास अधिकार दिलेला प्रेसिडेन्सी फौजदारी न्यायाधीश किंवा जिल्हा फौजदारी न्यायाधीश किंवा उपविभाग फौजदारी न्यायाधीश" हे शब्द दाखल करावे. |

| वर्ष | क्रमांक | लघु संज्ञा | सुधारणा कोठवर केली ते |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | | | ३०. कलम ११० मध्ये, "प्रेसिडेन्सी फौजदारी न्यायाधीश, जिल्हा फौजदारी न्यायाधीश, किंवा उपविभाग फौजदारी न्यायाधीश याबाबत राज्य सरकारने खास अधिकार दिलेला पहिल्या वर्गाचा फौजदारी न्यायाधीश यांस", ह्या शब्दांऐवजी "याबाबत राज्य सरकारने खास अधिकार दिलेला प्रेसिडेन्सी फौजदारी न्यायाधीश किंवा जिल्हा फौजदारी न्यायाधीश किंवा उपविभाग फौजदारी न्यायाधीश यास" हे शब्द दाखल करावे. |
| | | | ३१. कलम १२६ मध्ये,— |
| | | | (१) पोट-कलम (१) मध्ये, "प्रेसिडेन्सी फौजदारी न्यायाधीशाकडे" ह्या शब्दांनी सुरू होणाऱ्या "पहिल्या वर्गाच्या फौजदारी न्यायाधीशाकडे" ह्या शब्दांनी संपणाऱ्या मजकुराच्याऐवजी "ज्या न्यायालयाने तारण देण्याबद्दल आदेश दिला असेल त्या न्यायालयाकडे" हे शब्द दाखल करावे. |
| | | | (२) पोट-कलम (२) ऐवजी पुढील कलम दाखल करावे:— |
| | | | "(२) असा अर्ज करण्यात आल्यानंतर, न्यायालयाने, त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे, ज्या इसमाकरिता असा जामीन बांधलेला असेल त्याने न्यायालयापुढे हजर राहण्याविषयी किंवा त्यास न्यायालयापुढे हजर करण्याविषयी भाग पाडणारे आज्ञापत्र किंवा अधिपत्र काढले पाहिजे." |
| | | | ३२. कलम १३३, पोट-कलम (१) मध्ये,— |
| | | | (१) "जिल्हा फौजदारी न्यायाधीश, उपविवभाग फौजदारी न्यायाधीश किंवा पहिल्या वर्गाचा फौजदारी न्यायाधीश" ह्या शब्दांऐवजी "याबाबत राज्य सरकारने खास अधिकार दिलेला प्रेसिडेन्सी फौजदारी न्यायाधीश, किंवा जिल्हा फौजदारी न्यायाधीश किंवा उपविभाग फौजदारी न्यायाधीश" हे शब्द दाखल करावे; |

| वर्ष | क्रमांक | लघु संज्ञा | सुधारणा कोठवर केली ते |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | | | (२) शेवटच्या परिच्छेदात "त्याचेसमोर किंवा पहिल्या किंवा दुसऱ्या वर्गाचे इतर कोणत्याही फौजदारी न्यायाधीशासमोर हजर राहण्यास" ह्या शब्दांच्याऐवजी "त्याचे समोर किंवा इतर कोणत्याही अधिशासी फौजदारी न्यायाधीशासमोर हजर राहण्यास" हे शब्द दाखल करावे. |
| | | | ३३. कलम १४३ मध्ये, "जिल्हा फौजदारी न्यायाधीश किंवा उपविभाग फौजदारी न्यायाधीश किंवा याबाबत राज्य सरकारनें किंवा जिल्हा फौजदारी न्यायाधीशाने अधिकार दिलेला इतर कोणताही फौजदारी न्यायाधीश" ह्या शब्दांच्या ऐवजी "याबाबत राज्य सरकारने खास रीतीने अधिकार दिलेला प्रेसिडेन्सी फौजदारी न्यायाधीश किंवा उपविभाग फौजदारी न्यायाधीश किंवा याबाबात राज्य सरकारने किंवा जिल्हा फौजदारी न्यायाधीशाने अधिकार दिलेला अधिशासी फौजदारी न्यायाधीश" हे शब्द दाखल करावे. |
| | | | ३४. कलम १४४, पोट-कलम (१) मध्ये "किंवा (तिसऱ्या वर्गाचा फौजदारारी न्यायाधीश नाही असा) इतर कोणताही फौजदारी न्यायाधीश" ह्या शब्दांऐवजी "किंवा इतर कोणताही अधिशासी फौजदारी न्यायाधीश" हे शब्द दाखल करावे. |
| | | | ३५. कलम १४५, पोट-कलम (१) यात "किंवा पहिल्या वर्गाचा फौजदारी न्यायाधीश" ह्या शब्दांऐवजी "याबाबत राज्य सरकारने खास अधिकार दिलेला इतर कोणताही अधिशासी फौजदारी न्यायाधीश" हे शब्द दाखल करावे. |
| | | | ३६. कलम १४७, पोट-कलम (१) यात, "किंवा पहिल्या वर्गाचा फौजदारी न्यायाधीश" ह्या शब्दांऐवजी" किंवा याबाबत राज्य सरकारने खास अधिकार दिलेला इतर कोणताही अधिशासी फौजदारी न्यायाधीश" हे शब्द दाखल करावे. |

| वर्ष | क्रमांक | लघु संज्ञा | सुधारणा कोठवर केली ते |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | | | ३७. कलम १६४, पोट-कलम, (१) यात "कोणताही प्रेसिडेन्सी फौजदारी न्यायाधीश, पहिल्या वर्गाचा कोणताही फौजदारी न्यायाधीश आणि राज्य सरकारने याबाबत खास अधिकार दिलेला कोणताही दुसऱ्या वर्गाचा फौजदारी न्यायाधीश यास" ह्या शब्दांऐवजी "कोणताही प्रेसिडेन्सी फौजदारी न्यायाधीश, कोणताही जिल्हा फौजदारी न्यायाधीश, कोणताही उपविभाग फौजदारी न्यायाधीश, पहिल्या वर्गाचा फौजदारी न्यायाधीश, किंवा याबाबत राज्य सरकारने खास अधिकार दिलेला इतर कोणताही फौजदारी न्यायाधीश यास" हे शब्द दाखल करावे. |
| | | | ३८. कलम १६७ मध्ये,—<br>(१) पोट-कलम (१) मध्ये "अगदी नजीकच्या फौजदारी न्यायाधीशाकडे" ह्या शब्दांऐवजी "अगदी नजीकच्या न्यायिक फौजदारी न्यायाधीशाकडे" हे शब्द दाखल करावे.<br>(२) पोट-कलम (४) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करावे—<br>"(४) असा आदेश देणाऱ्या कोणत्याही फौजदारी न्यायाधीशाने त्याच्या आदेशाची एक प्रत, असा आदेश ज्या कारणांसाठी दिला त्या कारणांसह सेशन न्यायाधीशाकडे पाठविली पाहिजे". |
| | | | ३९. कलम १७०, पोट-कलम (३) हे गाळण्यात यावे. |
| | | | ४०. कलम १७४, पोट-कलम (५) मध्ये, "किंवा पहिल्या वर्गाचा फौजदारी न्यायाधीश आणि राज्य सरकारने किंवा जिल्हा फौजदारी न्यायाधीशाने खास अधिकार दिलेला कोणताही फौजदारी न्यायाधीश" ह्या शब्दांच्या ऐवजी "किंवा राज्य सरकारने किंवा जिल्हा फौजदारी न्यायाधीशाने खास अधिकार दिलेला फौजदारी न्यायाधीश" हे शब्द दाखल करावे. |

| वर्ष | क्रमांक | लघु संज्ञा | सुधारणा कोठवर केली ते |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |

४१. कलम १८६, पोट-कलम (१) यात, "जिल्हा फौजदारी न्यायाधीश, उपविभाग फौजदारी न्यायाधीश किंवा राज्य सरकारने (यासंबंधात) खास अधिकार दिला असेल तर पहिल्या वर्गाचा फौजदारी न्यायाधीश" या शब्दांऐवजी "किंवा उच्च न्यायालयाशी सल्लामसलत करून राज्य सरकारने याबाबत खास अधिकार दिलेला पहिल्या वर्गाचा फौजदारी न्यायाधीश" हे शब्द दाखल करावे.

४२. कलम १८७, पोट-कलम (१) यात, "प्रेसिडेन्सी फौजदारी न्यायाधीश किंवा जिल्हा फौजदारी न्यायाधीश याव्यतिरिक्त इतर फौजदारी न्यायाधीशाने, अटक केलेल्या इसमास जिल्हा किंवा पोट-तुकडी मॅजिस्ट्रेटाकडे पाठविले पाहिजे" ह्या शब्दांचे ऐवजी "अधिपत्र जारी करणाऱ्या फौजदारी न्यायाधीशाने अटक केलेल्या इसमास सेशन न्यायाधीशाकडे पाठविले पाहिजे" हे शब्द दाखल करावेत.

४३. कलम १९० मधील,—

(१) पोट-कलम (१) मध्ये,—

(अ) "जिल्हा मॅजिस्ट्रेटास किंवा पोट-तुकडी मॅजिस्ट्रेटास" हे शब्द गाळावे;

(ब) "दुसऱ्या कोणत्याही" ह्या शब्दांचे ऐवजी "कोणत्याही न्यायादान करणाऱ्या" हे शब्द दाखल करावेत;

(क) "त्याबाबत" ह्या शब्दानंतर "राज्य सरकारने उच्च न्यायालयाचा सल्ला घेऊन" हे शब्द दाखल करावे;

(२) पोट-कलम (२) मधील "किंवा राज्य सरकारच्या सामान्य किंवा खास हुकुमास पात्र राहून जिल्हा मॅजिस्ट्रेटास" हे शब्द गाळावे;

(३) पोट-कलम (३) मधील, "राज्य सरकारास" ह्या शब्दानंतर "उच्च न्यायालयाचा सल्ला घेऊन" हे शब्द दाखल करावेत.

| वर्ष | क्रमांक | लघु संज्ञा | सुधारणा कोठवर केली ते |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | | | ४४. कलम १९२ मधील—<br>(१) पोट-कलम (१) मधील, "जिल्हा मॅजिस्ट्रेटाने किंवा पोट-तुकडी मॅजिस्ट्रेटाने" हे शब्द गाळावे.<br>(२) पोट-कलम (२) मधील—<br>(अ) "कोणत्याही जिल्हा मॅजिस्ट्रेटास" ह्या शब्दांऐवजी "सेशन न्यायाधीशास" हे शब्द दाखल करावेत;<br>(ब) "आपल्या जिल्ह्यातील" ह्या शब्दाचे ऐवजी "सेशन विभागातील" हे शब्द दाखल करावेत.<br>४५. कलम १९३, पोट-कलम (२) मधील, "राज्य सरकार" ह्या शब्दानंतर "उच्च न्यायालयाचा सल्ला घेऊन" हे शब्द दाखल करावेत.<br>४६. कलम २०६, पोट-कलम (१) मधील,—<br>(१) "जिल्हा मॅजिस्ट्रेट, पोट-तुकडी मॅजिस्ट्रेट" हे शब्द गाळावे.<br>(२) "राज्य सरकारने" ह्या शब्दानंतर "उच्च न्यायालयाचा सल्ला घेऊन" हे शब्द दाखल करावेत.<br>४७. कलम २४९ मधील, "किंवा जिल्हा मॅजिस्ट्रेटाची आगाऊ मंजुरी घेऊन दुसऱ्या कोणत्याही मॅजिस्ट्रेटास" ह्या शब्दांऐवजी "किंवा राज्य सरकारने, उच्च न्यायालयाचा सल्ला घेऊन, याबाबत खास रीतीने अधिकृत केलेल्या इतर कोणत्याही फौजदारी न्यायाधीशास" हे शब्द दाखल करावेत.<br>४८. कलम २६०, पोट-कलम (१) मधील,—<br>(१) खंड "(अ) जिल्हा मॅजिस्ट्रेटास" हा गाळण्यात यावा.<br>(२) खंड (ब) आणि (क) मधील "राज्य सरकारने" ह्या शब्दानंतर "उच्च न्यायालयाचा सल्ला घेऊन" हे शब्द दाखल करावेत. |

| वर्ष | क्रमांक | लघु संज्ञा | सुधारणा कोठवर केली ते |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | | | ४९. कलम २६१ मधील "राज्य सरकारास" ह्या शब्दानंतर "उच्च न्यायालयाचा सल्ला घेऊन" हे शब्द दाखल करावेत. |
| | | | ५०. कलम २६५, पोट-कलम (२) मधील "राज्य सरकारास" ह्या शब्दानंतर "उच्च न्यायालयाचा सल्ला घेऊन" हे शब्द दाखल करावेत. |
| | | | ५१. कलम २६९, पोट-कलम (१) मधील "राज्य सरकारास" ह्या शब्दानंतर "उच्च न्यायालयाचा सल्ला घेऊन" हे शब्द दाखल करावेत. |
| | | | ५२. कलम ३३७, पोट-कलम (१) च्या परंतुकामधील, "जिल्हा मॅजिस्ट्रेटाशिवाय इतर" हे शब्द गाळावे आणि "जिल्हा मॅजिस्ट्रेटाची मंजुरी" ह्या शब्दांऐवजी "सेशन न्यायाधीशाची मंजुरी" हे शब्द दाखल करावेत. |
| | | | ५३. कलम ३४६, पोट-कलम (१) मधील,— |
| | | | (१) "प्रेसिडेन्सी शहराबाहेर" ह्या शब्दाऐवजी "बृहन्मुंबई बाहेर" हा शब्द दाखल करावा. |
| | | | (२) "जिल्हा मॅजिस्ट्रेट" या शब्दांचे ऐवजी "यथास्थिति जिल्हा न्यायाधीश किंवा सेशन न्यायाधीश" हे शब्द दाखल करावेत. |
| | | | ५४. कलम ३४९ मधील,— |
| | | | (१) पोट-कलम (१) मधील "असा मॅजिस्ट्रेट ज्या जिल्हा मॅजिस्ट्रेटाच्या किंवा पोट-तुकडी मॅजिस्ट्रेटाच्या ताब्यात असेल त्याजकडे" ह्या शब्दांचे ऐवजी "राज्य सरकारने उच्च न्यायालयाचा सल्ला घेऊन ह्या बाबतीत खास रीतीने अधिकृत केलेल्या पहिल्या वर्गाच्या फौजदारी न्यायाधीशाकडे" हे शब्द दाखल करावेत; |

